बुलढाणा/परभणी/अकोला/वाशिम/जालना/संभाजीनगर/जालना/बीड/नाशिक/पुणे/ठाणे/मुंबई/यवतमाळ/अमरावती.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

शनिवार ०७ मार्च २०२६

दैनिक

# सेवाशक्ती टाईम्स

आपल्या हक्काचे दैनिक

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

● वर्ष - ३ रे ● अंक - ३४४ ● पाने - ४ ● किंमत - २ रुपये ●



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या २०२७ च्या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या घोषणा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला, त्यामध्ये त्यांनी काही महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांसाठी अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये आगामी दोन वर्षां मध्ये महाराष्ट्रात नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे. त्या सोबतच महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येणार आहेत. आता शेत मजुरांचा सामावेश देखील गोपीनाथ मुंडे मंडळात करण्यात येणार असून, त्याचा मोठा फयदा या शेतकऱ्यांना होण्याची शक्यता आहे. याचबरोबर मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेची घोषणा देखील आजच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली आहे.दरम्यान ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे. चारही कृषी विद्यापीठात एआयची मदत घेतली जात आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारी पर्यंत झाले आहेत. चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले. अर्थसंकल्प मांडताना देवेंद्र फडणवीस यांना अजित पवार यांची आठवण आली. अजित पवार यांच्या जाण्याने राज्याचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले. अजित पवार यांचे भव्य स्मारक उभारणार असल्याची मोठी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. विकसित भारत २०४७ च्या विकासात आपला मोठा वाटा असेल. ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था करणं हे आपलं ध्येय आहे. राज्याच्या सर्व अर्थसंकल्पात विकसित महाराष्ट्राचं प्रतिबिंब दिसणार आहे.हा अर्थसंकल्प २०४७ च्या विकासाकडे जाणारा आहे. महात्मा फुले यांच्या जन्माला २०० वर्ष पुर्ण होत आहे. यासाठी एक समिती स्थापन करुन विविध कार्यक्रम आयोजन करण्यासाठी निधी दिला जाईल. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शताब्दी वर्षा निमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा केल्या जातील.

सामाजिक समरसता वर्ष म्हणून साजरा केला जाईल. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच काम पुर्ण झालं आहे काही योजना सुरु केल्या जातील. माझं अंतःकरण जड झाल आहे. अजित दादा यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्या करडी स्वभावामुळे शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणून त्यांच भव्य स्मारक उभारल जाईल. नागरी पुरस्कार त्यांच्या नावाने सुरु केला जाईल, असेही मोठे विधान देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडताना केले.

### ग्राम सडक योजना!

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ अंतर्गत २३ हजार किमीचे रस्ते तसेच पुलांची कामे हाती घेतली जातील, अशी घोषणा फडणवीस यांनी केली आहे.

### गाव जोडणी योजना!

१ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्याने जोडण्यात येईल अशी मोठी घोषणाही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

### पर्यटन क्षेत्राचा विकास!

निवडक ५० पर्यटन स्थळांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. यासोबतच वासोटा किल्ल्यावर पर्यटकांसाठी रोप वे प्रकल्प नियोजित केला आहे. राज्यातील तिसरी चित्रनगरी नागपूर येथे होईल, चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सहकार्य केले जाईल, ५ ज्योतिर्लिंगांसाठी पाच वरिष्ठ आयएएस अधिका-यांकडे समन्वय सोपवले आहेत, त्यासाठी आवश्यक निधी दिला जाईल, अशी घोषणाही यावेळी फडणीस यांनी केली आहे.

### महाराष्ट्र हे जागतिक उत्पादन केंद्र करणार!

1. संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केलं आहे. महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार आहे. 1 कोटींची मुख्यमंत्री मत्स्य योजना करण्यात येत आहे.
२. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा एक अंतर्गत ३० हजार किलोमीटर पर्यंत कामे झाली आहे.
३. उर्वरीत कामे मार्च अखेरीपर्यंत होत आहे. तीन टप्पे घोषित करत आहोत. २३ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते आणि पुलांचे कामे करण्यात येणार आहे.
4. १२३ अब्ज डॉलरवरून 1500 अब्ज डॉलर्स पर्यंत वाढविण्याचे उद्देश आहे. हाराष्ट्र हे जागतिक उत्पादन केंद्र बनवण्याचा उद्देश आहे.
5. राज्याचे नवीन गुंतवणूक व औद्योगिक सेवा धोरण जाहीर. इन्व्हेस्ट महाराष्ट्र हा एकसंघ डिजीटल प्लॅटफॉर्म तयार केला जात आहे.
6. या धोरणातून ५० लाख रोजगार निर्माण होणार आहे. तसेच यासाठी आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.
7. आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात करणार. गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचा ही समावेश करणार.

### मुंबईकरांना काय मिळणार?

ऐरोली ते कटई नाका भाग तीनचे काम पूर्ण होत आहे. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग बनवणार. अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार, मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रोने जोडणार. अटल सेतूला नवीन मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडण्यासाठी उलवे किनारी प्रकल्प पूर्ण करणार. दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गासोबत जोडण्यासाठी २०२८ पर्यंत काम करण्याचे प्रयत्न आहेत, अशा काही महत्वाच्या घोषमा देखील यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या आहेत.

### शेतक-यांसाठी महत्वाच्या घोषणा कोणत्या?

1. **शेतमजुरांचा विमा योजनेत समावेश:** गोपीनाथ मुंडे अपघात अनुदान योजनेचा विस्तार करुन आता त्यात शेतमजुरांनाही विमा संरक्षण दिले जाईल.
२. **मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजना:** शेतात जाण्यासाठी सोयीचे रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी ही नवीन योजना सुरु करण्यात येत आहे.
३. **नैसर्गिक शेती अभियान:** आगामी दोन वर्षांत संपूर्ण राज्यात 'महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान' राबवले जाणार आहे.
4. **महिला शेतकरी व गोपालकांसाठी योजना:** आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या निमित्ताने महिला गोपालक, शेळीपालक आणि कुक्कुटपालकांसाठी विशेष आर्थिक योजना राबवण्यात येतील.
5. **ग्रामसडक योजना टप्पा ३:** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिस-या टप्प्यात २३ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते आणि पुलांची कामे हाती घेतली जातील.
6. **कृषी मूल्य साखळी:** १० ते १५ महत्वाच्या ठिकाणांसाठी एकत्रित 'व्हॅल्यू चेन' (मूल्य साखळी) तयार करून शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून दिली जाईल.
7. **ॲग्रीस्टॅक (AgriStack) आणि फार्मर आयडी:** आतापर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी तयार झाले असून, फेब्रुवारीपर्यंत उर्वरित प्रक्रिया पूर्ण केली जाईल.
8. **AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा वापर:** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये शेती कामांसाठी 'एआय'ची मदत घेतली जात आहे.
9. **हवामान व बाजारभाव माहिती:** ३० लाखांहून अधिक शेतक-यांना थेट हवामान आणि बाजारभावाची अचूक माहिती पुरवण्यात येत आहे.
10. **मुख्यमंत्री मत्स्य योजना:** मत्स्य व्यवसायाला चालना देण्यासाठी १ कोटी रुपयांची विशेष योजना राबवली जाणार आहे.
11. **भांडवली गुंतवणूक:** पुढील चार वर्षांत शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी भांडवली गुंतवणूक केली जाईल.

## बारामतीत लॉजवर पोलिसांचा छापा! देहव्यापाराच्या रॅकेटवर कारवाई; चार मुलींची सुटका

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

बारामती : पुण्यातील बारामती तालुका पोलिसांनी भिगवण रोडवरील प्रणव लॉजवर छापा टाकत देहव्यापाराच्या अड्ड्यावर मोठी कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचा आरोप



करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत यांनी याबाबत बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी सोमनाथ महादेव खोमणे, धिरज रामभाऊ जाधव, सागर संजय सोडबुके, मेराजुल जानीफ अली. अफजल मझीबर रहमान हुसेन आणि सदाम जुमरुद्दीन हुसेन यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी परराज्यातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उपजीविका चालवित असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या कारवाईत पोलिसांनी आसाम येथील रहिवासी असलेल्या तीन वय ३०, वय २१, वय २६, आणि पश्चिम बंगाल एक वय २२ वर्ष अशा चार महिलांची सुटका केली.

## कॉलेजमधले प्रेमसंबंध, सोनालीच्या लग्नानंतरही भेटायचा; ट्रॅप लावला, होळीला गावी आलेल्या सागरची पती-पत्नीनं मिळून हत्या केली

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

नागपूर : सोनाली गजभिये आणि सागर वानखेडे यांच्यात शिक्षण घेत असताना प्रेमसंबंध होते. मात्र पुढे सोनालीचे लग्न राजू गजभिये याच्यासोबत झाले. लग्नानंतरही सोनाली आणि सागर यांच्यात संपर्क कायम असल्याचे समजते. या कारणा वरुन राजू गजभियेने यापूर्वी खापरखेडा पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली होती. दरम्यान, होळीच्या सणानिमित्त सागर पुण्यावरुन आपल्या सावंगी गावात आला होता. त्यावेळी त्याने इंस्टा ग्रामच्या माध्यमातून सोनालीला मेसेज पाठवून भेटण्यासाठी बोलावले. गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास सागर खापरखेडा येथे पोहोचला. श्याम मंगल कार्या लया जवळ सोनाली त्याच्या दुचाकीवर बसली आणि दोघेही तेथून निघाले. यावेळी सोनाली आपल्या सोबत एक चाकू घेऊन



गेल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे राजू गजभियेने मुलांना शाळेत सोडल्यानंतर दोघांचा पाठलाग सुरु केला. खापरखेडा - कोराडी मार्गावर कोलार नदीचा पूल ओलांडल्यानंतर सोनालीने मुद्दाम आपली पर्स खाली पाडली. सागरने दुचाकी थांबवून पर्स उचलण्यासाठी खाली वाकताच सोनालीने चाकू काढून त्याच्यावर दोन वार केले. त्याच वेळी घटनास्थळी पोहोचलेल्या राजू गजभियेनेही सागरवर चाकूने अनेक वार केले. या हल्ल्यात सागर गंभीर जखमी झाला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर दोन्ही आरोपी आपल्या घरी परतले. त्यानंतर ते पोलिस ठाण्यात जात असताना पोलिसांच्या डीबी पथकाने त्यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोघांनीही हत्या केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# दरोडा

जाई जुईच्या मांडवात पडलेल्या फुलासारखं अंगावर उन्हाचे शिंतोडे वागवत थोरल्या वाड्यात आमराईवरनं जायची यायची रखमाची वाट काही चुकली नव्हती. पण आज मात्र तिच्या पावलांचे ठसे आमराईच्या झाडाच्या मातीतून गेले होते. चंद्रावरल्या खळग्यासारखे रानभर तिच्या पायाची निशाणी उगवून आली होती. थोरल्या मालकीणबाईंचा हुकूमच तसा होता.

"रखमे उद्या वाड्यात येताना आमराईतनं चार सहा आंबे घेऊन ये. कच्च्या कैऱ्या काही कामाच्या नव्हेत. आंबाच आण,पाडाचाही चालेल पण आंबाच हवा कसे? घेऊन ये बाय तेवढं"

दगडाचा नेम धरुन जमिनीवर पडू लागलेले आंबे रखमेने पदरात झेलले. जणू आभाळातून चांदण पडावं तसं तिनं हिरव्या लुगड्याच्या पदरात काहीस झेललं. आंब्याच्या झिम्म्याच्या ओझ्यानं भरलेला पदर खेचून वाड्याकडे रखमा रवाना झाली. वाड्यातल्या त्या बंदिस्त खणाकडे तिची सावली हरणाच्या वेगाने पोहोचली. ओटीसाठी सजवलेल्या चांदीच्या तबकात रखमेनं आणलेले आंबे थोरल्या बाईसाहेबांनी अगदी अलगद हाताने ठेवले. तशी रखमाई भरुन पावली. गालावरची पाकळी रुंद करुन तोंडभरुन हसली आणि कुठल्याश्या सुखाच्या हिंदोळ्यावर डोलत राहिली.

रखमा पाठ टेकून राहिलेल्या भिंतीच्या पलीकडील न्हाणीघरातून बायांचे हास्याचे तुषार उडू लागले होते. 'रत्ना'च्या नाजूक कोवळ्या अंगाला सुंगधाच्या तेलाची स्त्रि बोटे मायेचा स्पर्श करीत होती. हळदी चंदनाच्या लेपानं रत्नाच नाजूक मन पाण्यावरल्या पानासारखं हुळहुळत होतं. शिकेकाईच्या पाण्यानं तिला न्हाऊ माखू घालणाऱ्या घरच्याच ओळखीच्या स्त्रियांच्या नजरा तिला अनोळखी वाटू लागल्या. त्यांच्या थट्टा मस्करीने तिच्यावर चढलेला लज्जेचा भृंगा तिला अंतर्बाह्य छळत होता. या बायामाणसांच्या दाटीवाटीत कसनुस करणार तिच अडनिडं मन कधी हसत होतं, कधी त्रासत होतं, कधी हळव उदास होतं होतं. खरतर या मनालाच काय सांगाव नि काय समजून घ्याव हेच कळत नव्हतं. त्यामुळे रेशमाचा गोंडा एखाद्या खिळ्यात अडकावा नि दूर दुर रेशमाचे जाळे पसरत जावं अशी अवस्था रत्नाची झाली होती.

तोवर इकडे रखमाच्या थोरल्या बाईसाहेबांनी म्हणजे रत्नाच्या आज्जीने त्या बंदिस्त कणाचा जणू उद्यवनाचा भास निर्माण केला होता. सोप्यातल्या झोपाळ्याचा माचा आता रत्नाचे न्हाणाचे मखर होऊन पानफुला सोबत गुजगोष्टी करत होता. हरेक खुंटीला अडकवलेले आंब्याचे डहाळे गळ्यातल्या कंठा अलंकारासारखेच शोभून दिसत होते. समईच्या सातही कळ्या हे आनंदाचे चित्र सगळ्यापुढे स्पष्ट करत होत्या. पण रत्नावलीच्या कानात मात्र नव्या जाणिवांच्या गुपितांचे गुंफे बायामाणसं विणतच होत्या. कुणी ताई तिच्या न्हाणाच्या मखराची गोष्ट तिला सांगत होती. तर कुणी माई तिच्या लटक्या लटक्या रागाला वारा घालत होती. तर कुणी तिकडची आठवण काढुन तिच्या प्रेमाची तार छेडत होती. उंची साडी नेसलेल्या व अबोली कुंदाच्या गजऱ्याचे दागदागिने ल्यालेल्या रत्नाचा जीव मात्र भर दिवसाही काजव्यासारखा लुकलुकत होता. औक्षणदिव्यासोबतच जणू आपला जीवच आज्जीने रत्नाला ओवाळला होता. भरजरी वस्त्रात दबल्या गेलेल्या रत्नाचा ओचा फळांच्या ओटीनं भरगच्च भरला होता.

आता रत्ना ऋतूस्नात झाल्यानं तिला सासरी धाडणं ओघानं आलंच होतं. त्याआधी रत्नाचे वडील चिंतोकाकांनी विठोबा सोबत रत्नाच्या खुशहालीचा सांगांवा धाडला. तर रत्नाची आई मंदाकाकीनं मुरडीच्या कानोल्याची दुरडीभरुन शिदोरी रत्नाचे सुख सांगत तिकडील मंडळीस पोहचती केली होती. सांगावा व शिदोरी घेऊन विठोबा तिकडे रवाना झाला. विठोबाला जाण्याकरिता दो दिवस नि येण्याकरिता दो दिवस चार दिवसाची तर परीटघडी पक्की होती. तोवर या झाडावरले पाखरु त्या झाडावर नि त्या झाडावरुन फडफडत पुन्हा त्याच त्याच शोधात बुडालेलं पाखरु इतकेच रत्नाने जोखले होते. विठोबाकडून तिकडून येणाऱ्या निरोपाकडं रत्नाच लक्ष लागून राहिले होते. तर इकडे रखमाबाईदेखील विठोबाच्या वाटेला डोळे लावून बसल्या होत्या. अखेर रखमेची ठरल्याप्रमाणे चार दिवसाने रुखरुख थांबली. तिकडील माघारचा सांगांवा घेऊन विठोबा थोरल्या वाड्यात परतला.

||श्री||

ति.रा.रा चिंतोपंत यांस–

श्री महादेवाचा शि.सा न.वि वि

चि. सौ रत्ना ऋतूस्नात झाल्याची बातमी समजली. खूप आनंद वाटला. आता सौ रत्नावली व श्री चिदानंद यांच्या सहजीवनाचे नवीन पर्व चालू होईल. जीवाला समाधान वाटले. परंतु एक मोठी दुविधा आमच्यापुढे येऊन ठाकली आहे. गावात व मुलखात सध्या मोठमोठे दरोडे पडत आहेत. क्वचित एकदोन ठिकाणी अघटितही घडून आल्याने भितीचे सावट सर्वदूर पसरले आहे. अश्यावेळी सदसद्विवेकबुद्धीस स्मरुन आपणास सांगणे आहे की या संकटाची सावली थोडीबहुत दूर होताच चि सौ रत्नावलीस घेऊन यावे. अन्यथा एखादा चांगला दिवस नक्षत्र पाहून आम्ही व मंडळी स्वतः येऊ तिकडे. सवारीच्या बैलगाडीतून सुनबाईस तिच्या घरी आणू. कसे? हेच योग्य ठरेल. बाकी सर्व क्षेमकुशल आहे. कसलीही चिंता करु नये.

कळावे

लोभ असावा.

ता.क. विठोबासोबत सौ रत्नावलीकरिता मौल्यवान जिनसा पाठविल्या आहेत त्या तिचकडे सुपूर्द कराव्यात.

तिकडील घराकडून ही आनंदाची वार्ता समजताच रत्नाच्या अंगाअंगावर मखमली मोरपीस फिरत राहिले. उठता बसता जेवता खाता वेडीला एकच वेड लागलं होतं. त्याच्या डोळ्याच्या तळ्याशी त्याची वाट पहात राहण्याचं. दिवसरात्र कानाला एकच आवाज ऐकू येत होता तो म्हणजे घुंगरांच्या गाडीचा. माडीवरल्या पडवीच्या खिडकीला दुपारनंतर ठाणच मांडून रहायची. नजर जाईल तिथवर पहात रहायची घुंगराची गाडी. अन नजरेच्या पल्याडही पाहण्याचे तिचे डोळे धाडस करायचे. अगदी तिन्हीसांज ओलांडून अंधार पसरु लागला की अदृश्याने नकाशे बांधलेल्या नक्षत्रांना पुढले भविष्य विचारायची. भविष्याचा पथ कुणालाच न कळल्याने जो तो तिला मेघांचा धुसर धुक्याचा झुलता साकव दाखवायचा. त्यापल्याडच्या पाण्याच्या आरशात सुखाचे बिंब हलतसे रहायचे. त्यावर डहुळणाऱ्या फांदीच्या स्पर्शाने तिचे हात रक्तबंबाळ व्हायचे. परंतु त्यांच्याशी वायदा केल्याचे कंदीलाच्या काचेला ती बजावायची. अन चंद्राच्या निळसर साक्षीनंतर सूर्य दुसरा दिवस दाखवायचा. कदाचित दुसरा दिवसही हेच ओझे अंगाखांद्यावर वागवित तिच्यापुढे यायचा.

दरोडेखोर त्यांच उत्पन्न कमवून पुष्कळशा श्रीमंतांना कफल्लक करुन त्या गावातून ते चालतेही झाले. त्यानंतर एका प्रवाश्यानं तिकडील खबरेचं पत्र चिंतूकाकांकडे पोचतं केलं. वाळूच्या एकेक कणासारखा रत्नावलीने एकेक क्षण तिकडील निरोपासाठी पणाला लावला होता. तिच्या अपेक्षेनुसार पानभर चिठ्ठी तर आली होती. परंतु त्यातला मजकूर निराशाजनक होता. तिथल्या मुलखात साथीचा आजार पसरला होता. या आजाराचा गुंजभर असलेला विषाणू सहा फुटाचा माणूस गिळंकृत करुन टाकत असल्याचं पत्रात नमूद केलं होतं. पत्रातील सांगण्यानुसार त्या मुलखातली मानवी संपत्ती धोक्यात आली होती. पुन्हा एकदा काही दिवसांकरिता कदाचित काही महिन्यांकरिता रत्नाचं सासरी जाणं रखडलं होतं.

चातक पक्षी स्वाती नक्षत्रातून ओघळलेला पावसाचा मोतीथेंबाची वाट पाहतो तशीच गत रत्नाची झाली होती. तिकडील निरोपाच्या चाहूलीची वाट पाहत पाहत निराशेच्या गर्तेत दोर नसलेल्या घागरीसारखी फिरत राहिली. मागाहून विठोबाच्या दोन चार खेपा रत्नाच्या सासरघरी झाल्या. सासरघराकडून आलेला प्रवासीही चार हेलपाटे तिच्या माहेरघरी टाकून गेला. परसात वाढत चाललेल्या जांभळीच्या झाडागत नवनवीन ज्ञात अज्ञात कारणाने रत्नाचं जाणं लांबलं होतं. तेही ठीकच होत तस. पण एक दिवस अचानक विजेसारखी एक बातमी येऊन कोसळली. रत्नावलीचा नवरा एकाएकी रात्रीतून घरातून परागंदा झाला होता.

घड्याळाचा लंबक मागे पुढे हिंदोलत राहतो. तसा रत्नाच्या जीवाच्या अरण्यात सुर्यप्रकाशासारखा येणारा तो दिवस मागेपुढे घुटमळत होता. तिच्या लग्नाचा दिवस. अवघी आठ वर्षाची चिमुरडी भातुकलीतल्या बाहुला बाहुलीच्या खेळाला भुलणारी लग्नाच्या बोहल्यावर चढली होती. मीच का पहिला हार घालायचा म्हणून रुसूनही बसली होती. त्याउपर नवऱ्याने नकटी म्हणून चिडवल्यावर मांडवात रडूही साजरं केलं होतं. या क्षणांची वर्तुळ गोल घारीसारख्या तिच्यासमोर घिरट्या घालत होती. चिदानंदाशी विवाह झाल्यानं ती सौभाग्यवती तर होतीच. पण चिदूने सर्वसाक्ष दिलेल्या वचनाची पूर्तता करण्याकरिता अजून ती अखंड कुमारिका होती.

कालचक्राची गती थांबणारी नव्हती. रत्नाच्या पाठच्या बहीणींचे लग्न सोहळे होऊन संसार उभे राहिले होते. गुंफागुंफीच्या विणलेल्या जाळ्यात उभ्या राहिलेल्या वेलीला आपसूक फुल यावीत तशी चिमुकली पावलंही त्या दोघींच्या अंगणात खेळत होती. रत्ना मात्र सगळं सुखदुःख पारख्या नजरेनं पहात होती. सारीपाटाचा डाव मांडायला तिचे नशीबही राजी व्हायचे नाही. तिची धगधगत्या वेदनेच्या ज्वाळा कुणापर्यंत पोहचत नव्हत्या असं नाही. पण त्या विझल्या जात नव्हत्या. कुठल्यातरी असंबद्ध मानसिक कर्माचे मांजर तिच्या पायी घुटमळत रहायचे. त्या मांजराला काही तिच्या पापपुण्याचा ताळा माहित नसायचा. ते केवळ घुटमळत रहायचे. तेवढच तर ठाऊक होतं त्याला. माहेरघरी खाललेल्या अन्नाची बटिक म्हणून रत्ना वापरायची. सासरघरच्या उंबऱ्यानेही तिला पुष्कळ पुकारलं होतं. पण जिथं चिदा नाही तिथ रत्ना कशी राहील? याच एका माणसाच्या ओढीनं सगळं सासर तिनं तिच्या मायेत दडवलं होतं. जणू एखाद्या रेशीमकिड्यानं आपल्या अंतर्गत लाखमोलाच काव्यासारखं दीर्घ कौशेय जपावं.

त्यादिवशी–

ती परसातल्या आडाचं पाणी घागरी घागरीनं उपसतं होती. तिच रोजच नेमाचंच ते काम. त्यामुळे सरावलेला हात विचाराआधी रहावरुन घागरीवर पोहोचत होता. धीम्या धीम्या गतीने भरलेल्या घागरी ओढून विहीरीबाहेर आल्या होत्या. कोयंड्यात कडी आपसूक बसावी तशी कमरेवरची घागर स्थिर झाली. पण डोईवरल्या बारक्याश्या कळशीनं मात्र घात केला होता. कळशीचा तोल सुटल्यानं रत्ना ओलेती झाली. जणू सचैल स्नान घडाव तस तिच अंगअंग पाण्यानं भिजून गेलं. पर्णावरुन पाणी ओघळून पडाव तस पाणी केसातून तिच्या लुगड्यात झिरपत होतं अन निथळतही होतं. काजळाच्या डबीसारख तिनं जपलेलं सौंदर्यही तेही मोत्याच्या सरीसारखे ओघळू लागले होते. परंतू तिच्याकडं कोणते तरी दोन डोळे स्थिरावल्यासारखे झालेत हे तिनं सुप्त मनान ओळखलं. भिंगरी फेकावी तस तिनं त्या दोन नेत्रपाखरांकडं एक कटाक्ष टाकला. समोरच्या बंद वाड्याची दारं व खिडक्या उघडल्या गेल्या होत्या. तिच्या कटाक्षानं त्याची छबीही तिने क्षणार्धात चित्रासारखी टिपली. माडीवरल्या सज्जातून कुणीस तिला न्हाहाळत होतं. त्या कटाक्षाचे वेगळेपण ठसठशीत तिला जाणवत होतं. त्याला गंध नव्हता, रंग नव्हता, मखमाली काटे मात्र होते. त्या नजरेचा कोश तिनं तिच्याही नकळत लपेटून घेतला व चालती झाली.

तिन्हीसांज उलटून गेल्यावर–

नेहमीप्रमाणं पुरुषांची पंगत उरकून बराच वेळ झाला होता. बायकांची पंगत बसायला अवकाशसा होता. पुन्हासा भात तपेल्यात शिजत होता. त्याला दणकून वाफ येईपर्यंत गप्पांचे वाफे पेरले गेले होते. रत्ना तशीही अबोल तशात आजची ती नजरबंदी तिच चित्त थाऱ्यावर कुठे होतं. गवताच्या पात्यासारख डुलत होतं. वाफ येतासरशी झुळूकीनं बगीचा हलावा तश्या खांबाला भिंतीला टेकून बसलेल्या बाया गोलाकार वर्तुळात विस्कळीत झाल्या. कित्येक वर्ष बंद असलेल्या धाकला वाड्यात कुणी राजगायक रहायला आल्याची वर्दी गावभर. नि गावभर फिरुन सोफ्यातून थेट बायकांच्या पंगतीत स्वयंपाकघरात पोहोचली होती. ती बातमी ऐकता ऐकता भाजीत कमी पडलेलं मीठ रत्ना लावून घेत होती. तेव्हा तिच्या बांगड्या किणकिणू लागल्या. दो घडीचही गुपित छपून जाईना. तेव्हा डाव्या हातानं उजव्या हाताला आपसूक मुकं केलं. पानावर बसलेली रत्ना उगाचच खजील झाली. याची दखल फारशी कुणी घेतली नाही. कारण उघडपणे काही जाणवलच नाही. सारी रत्नाच्या मनाची चलबिचल.

खजिन्याच्या कोठारात त्याच्या मालकाचे आगमन होताच त्याच्या केवळ किरकोळ वाटाव्या अशा आज्ञांनी बंद दरवाजे खुले होत जातात.

तसच काहीस पुढे घडून आलं. रत्नाच्या पाणी भरायची वेळ अन त्या कमानीच्या नक्षीनं सांभाळलेला सज्जाचा दरवाजा उघडायची एकच वेळ असायची. दृष्टादृष्टीनं मुकपत्र कुणी कुणाला पाठवले जायचे.

तर कधी ती उशीरा पोहचायची तर कधी चार चार दिवस बंद दरवाजा तिची विचारपुस करायचा. जणू पाठशिवणीचा खेळ चालायचा. आता मात्र एकदाही डोईवरली कळशी हेंदकाळली नाही. कारण नजरानजरेच फुल वेणीत खोचून ती पाठमोरी व्हायची. त्या डोळ्यांचे चुंबक तिला खेचू पहायचे.

पण तिच्या दंडाला बांधलेला सत्य असत्याचा दोर या बालखेळातून तिला दूर सारायचा.

तो मात्र तिथेच रेंगाळत रहायचा. पण बोलाफुलाला गाठ पडते म्हणातात ना.

तसे या दोघांमधल्या उर्जेला अचानक आकार सापडला आणि शेजारच्या यमुनेच्या रुपानं तो प्रगट झाला.

पट्टीचे तबलावादक असणाऱ्या शामुकाकांची यमुना गोड गळ्यानं पहाटे ओवी गायची तेव्हा अर्धझोपेतली रत्ना जागी व्हायची. तिच्या सुरात सुर मिसळून रत्नावली देखील गाऊ लागायची.

धाकल्या वाड्यात रहायला आलेल्या राजगायकाकडे यमुनेची गाण्याची शिकवणी सुरु होणार होती. यमुनेला सोबत होईल व रत्नाचाही जीव गमेलं अस अनूमान शामुका कांनी चिंतोबाबापुढ योजलं. जणू रत्नाच्या मनातील पाचूला पैलू पडू लागले होते. अखेरीस तो दिवस उजाडला. संपूर्ण क्षितीज लालसर झाले होते. त्या लालीच्या छायेत जणू सगळीच सृष्टीची दृष्टी सांडून गेली होती. त्या राजगायकाच्या घरात रत्नाचे पहिले पाऊल पडले.

खरतरं ज्या नजरेनं तिचे चित्त चोरले होते. त्याहुनही त्या गायकाच्या गोड आवाजाने तिचे हृदय व्याकुळ झाले होते.

त्याच्या स्वरांची वलय तिच्या सभोवती जणू प्रतिविश्व साकारायची. ज्याचा अधिपती तो राजगायक 'शशीनाथ' असायचा. त्याने भूप आळविताच तिच्या मनाची पक्षीण जागृती स्वीकारायची. तर बिलावल साकारताच तिचा देह जाणीवेचा व्हायचा .त्याने सारंग गाताच तिच्यातली स्वाभाविक नदी खळखळाट करत वाहत रहायची. तर त्याने तोडी आळविताच दूरदूर वनांतरी भटकणारे तिच्या काळजाचे हरीण त्याच्या पावलापाशी येऊन बसायचे. तर कधी ती जोगिया गाऊन शब्दावाचून तिचे दुःख सहज मांडून जायची.

तर कधी चंद्रकंस गाता गाता विरहाची वेदना चांदण्यानी बांधलेले मौक्तीक हार तोडून टाकायची. शशीनाथाला ही स्वरांच्या भाषेत गुंफलेली कोडी उलगडणे फारसे काही अवघड नव्हते. तिचे जीवनकहाणी आता सर्वदूर श्रुत होती. त्यापासून शशीनाथ अनभिज्ञ नव्हता. तिच्या वाट्याला आलेल्या शापभोगाकडे तो करुणेने पहात होता. या करुणेच्या वारुळातील दुःखाच्या मुंग्या दूरदुरपर्यंत जाऊन पोहोचल्या होत्या.

परंतु तिच्या या अवस्थेकडे पाहुन कुणीतरी कळवळलं. तिच्या हातातला विस्तव त्यानं झटकून दिला. आणि तिच्या हातावर अलवार फुंकर घातली. तू कोण? कसा आलास? या प्रश्नाचे घोंगडे तिने पसरण्यापुर्वीच तो तिच्याशी बोलू लागला.

"रत्नावली ओळखलंस का मला? मी चिदानंद तुझा नवरा. माझ्या अश्या अवतारात तू मला ओळखणं शक्य नाही. माझ्याजवळ वेळ कमी आहे. तेव्हा मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐक. आपला देश संकटात आहे. मी देशकार्यात सहभागी झालो आहे. इंग्रजांविरुद्ध असलेल्या गुप्तकटात मी सामील आहे. म्हणून मी घर सोडून निघून गेलो. आम्हाला सांगणेच तसे होते. गुप्तता रहावी म्हणून मी घरीही कोणता निरोप पोहचवला नाही. आता काही दिवसातच मी यातून मोकळा होईन. मग आपण आनंदाने संसार करु. आजची रात्र तुझ्या घराचा मला आसरा दे. सूर्य उगवण्यापुर्वीच मी निघून जाईन"

वाढलेल्या दाढी जटा, किरकोळशी झालेली अंगकाठी रत्नानं चिदानंदला ओळखणे शक्यच नव्हते. तो घर सोडूनच अडीच तीन वर्षे होऊन गेली होती. त्यापुर्वी चार वर्षामागं तिनं त्याला गावच्या यात्रेकरिता गेल्यावर पाहिले होते. त्याचे डोळे जर एकटक लावून तिने तेव्हा पाहिले नसते तर कदाचित आजही ती चिदूला ओळखू शकली नसती. त्याच्या कथनानंतर तिने त्याला एकच सवाल केला?

"तुमच्या घरावर खरच दरोडा पडला होता का? "

"हो दुर्दैवानं हे खरय. कुणाच्या जीवाला काही धोका नाही झाला. सोन चांदी रोकडं उचलून नेले. जे गुप्तपणे राखले होते ते शिल्लक राहिले. पण तू काळजी करु नकोस. तुझ्या नवऱ्यावर विश्वास ठेव. गेलेली संपत्ती तो मिळवून आणेल"

त्याचे बोलणे ऐकून रत्ना तोंडातल्या तोंडात पुटपुटत होती.

"दरोडा पडली ही खोटी कहाणी नव्हतीच. लुटालुट झाली. पुरती लुटालुट झाली. दरोडा पडला"

## || जागतिक महिला दिन विशेष

## शीर्षक: स्त्री-शक्तीचा सन्मान आणि साक्षरतेचा वसा: विकसित भारताचा पाया

– शब्दांकन –
धनंजय संजय पाळसकर (DSP)
(M.A. Public Administration, B.Sc. Microbiology)
डोणगांव, ता. मेहकर, जि. बुलढाणा
YouTube: DSP Shabd-Rang

प्रस्तावना: जागतिक महिला दिनानिमित्त केवळ शुभेच्छा देऊन चालणार नाही, तर आपल्याला 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक नात्यातील स्त्रीचा सन्मान आणि तिचे शिक्षण यावर भर द्यावा लागेल.

आई, आजी, पत्नी, मुलगी यांपासून ते सासू-सुनेपर्यंत प्रत्येक नाते हे समाजाचा मुख्य आधार आहे. स्त्री जेव्हा साक्षर होते, तेव्हा ती केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर संपूर्ण पिढीला सुशिक्षित करते.

कविता : आई, आजी, बहीण अन् लेक घराचे हसू, पत्नी, मैत्रीण, प्रियसी.. जिच्या मायेत आपण फसू, काकू, आत्या, मावशी, मामी, ही नात्यांची सुंदर गुंफण, सासू-सुनेच्या प्रेमातून घडते, सुसंस्कारी घराचे जपण.



नात्यांच्या पलीकडे आता, एक 'शिक्षित' क्रांती घडवूया, येणारी पिढी ज्ञानाने, पूर्णतः 'साक्षर' बनवूया, कोणतेही क्षेत्र असो, ती तिथे 'अग्रेसर' असेल, शिक्षणापासून वंचित कोणी, आता कधीच नसेल. विकसित भारताचे स्वप्न, तिच्या हातांनीच साकार होईल, स्त्री - पुरुषांच्या सन्मानाने, देश हा डौलाने पुढे जाईल..ना कुणाचा अपमान, ना कोणाला कमी लेखणे, परस्परांच्या आदरातच आहे, संस्कृतीचे खरे देखणे. नव्या पिढीची जबाबदारी, तिने आनंदाने पेलली, विकासाची ही मशाल, तिने घराघरात नेली. स्त्रीने जपावे नाते, पुरुषाने द्यावा मान, तेव्हाच उंचावेल जगात, आपल्या भारताची शान!

निष्कर्ष : जेव्हा प्रत्येक पुरुष स्त्रीच्या कर्तृत्वाचा आदर करेल आणि प्रत्येक स्त्री आपल्या पुढच्या पिढीला साक्षर करण्याची जबाबदारी घेईल, तेव्हाच आपला देश खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' म्हणून ओळखला जाईल. नात्यांचे पावित्र्य टिकवून एक मेकांच्या प्रगतीचे भागीदार होणे, हीच काळाची गरज आहे. जागतिक महिला दिनाच्या सर्व माता-भगिनींना हार्दिक शुभेच्छा!




दिव्यात इंद्रधनू मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती वं भव्य शिव प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली यंदा मंडळाचे २२ वे वर्षे असून ही दिव्यातील पहिली शिवजयंती आहे असे मंडळाचे अद्यक्ष तुषार पाटील यांनी सांगितले यावेळी मंडळाचे शेकडो कार्यकर्ते वं पदाधिकारी दिवा ग्रामस्थ उपस्थित होते फोटो - अमित जाधव

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# कासापुरी सर्कलमध्ये शिवसेनेचा झंझावात
# अनंत वाकणकरांसह पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात जाहीर पक्षप्रवेश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**





पाथरी/परभणी : तालुक्यातील कासापुरी सर्कलमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला असून युवा नेतृत्व अनंत वाकणकर यांच्यासह विविध पक्षांतील अनेक पदाधिकारी व कार्य कर्त्यांनी शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. शिव सेनेचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाप्रमुख सईद खान यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत हा पक्षप्रवेश त्यांच्या निवासस्थानी उत्साहात पार पडला. या पक्षप्रवेशामुळे परिस रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून कासापुरी सर्कल मध्ये शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. कार्य क्रमाच्या अध्यक्षस्थानी सईद खान उपस्थित होते. यावेळी दसरथ सावंत (सरपंच), गोविंद गिरगुणे (उपसरपंच), एकनाथ सावंत (ग्रामपंचायत सदस्य), भारत सावंत (सदस्य), सुरेश सावंत (चेअरमन), गुलाबराव पवार (उपसरपंच), अजितराव कोल्हे (चेअरमन), अर्जुनराव डोणे (माजी सरपंच), भैय्या साहेब गायकवाड (सोसायटी सदस्य), परमेश्वर शिंदे (सदस्य), हरिभाऊ शिंदे (सदस्य), ज्ञानेश्वर गोरे (माजी सरपंच), अनिलराव कोल्हे (चेअरमन) यांच्यासह असंख्य नागरिक आणि युवक कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी अनंत वाकणकर यांच्या निर्णयाचे जोरदार स्वागत केले.यावेळी बोलताना सईद खान म्हणाले, "राज्यात विकासाभिमुख आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांवर आमचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या मार्गदर्शना खाली कासापुरी सर्कल मध्ये विकासकामांना गती देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." स्थानिक पदाधि काऱ्यांनीही अनंत वाकणकर यांच्या प्रवेशामुळे युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. विशेषतः युवकांची वाढती उपस्थिती आणि त्यांचा उत्साह पाहता आगामी काळात संघटनात्मक पातळीवर शिवसेना अधिक सक्षमपणे कार्य करेल, असे मत व्यक्त करण्यात आले. या ऐतिहासिक पक्ष प्रवेशामुळे कासापुरी सर्कलमध्ये शिव सेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होणार असून युवकांच्या जोश, ऊर्जा आणि नेतृत्वामुळे पक्षकार्याला नवी दिशा मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

# उमरदरी बहिरखेड ग्रामपंचायतच्या तत्कालीन सरपंच व तत्कालीन ग्रामसेवकांच्या कारवाईनंतर आता बड्या अधिका-याचा नंबर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**




बार्शीटाकळी : बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर गावाजवळ असलेले मौजे उमरदरी बहिरखेड ग्राम पंचायतच्या तत्कालीन सरपंच सौ, कविता किरण ठाकरे आणि ग्रामसेवक तृप्ती पाटील यांचे विरुद्ध दिनांक २१/१/२६ रोजी पिंजर पोलिसात कलम ४२० नुसार इतर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, त्यानंतर आता यामध्ये बार्शी टाकळी पंचायत समितीच्या तत्कालीन बड्या अधिकाऱ्या विरुद्ध कलम ४२० व इतर गुन्हे दाखल होणार असल्याची विश्वासनीय माहिती प्राप्त झाली आहे, त्यामुळे उमरदरी, बहीरखेड ग्रामपंचायतचे प्रकरण अजून पुन्हा चर्चेत येणार असल्याचे संकेत आहेत, दिनांक २१/१/२६ रोजी पिंजर पोलिसात अनियमितेचा ठपका ठेवत उमरदरी बहिरखेड ग्राम पंचायतच्या तत्कालीन सरपंच सौ, कविता किरण ठाकरे आणि तत्कालीन ग्रामसेवक तृप्ती पाटील यांचे विरुद्ध कलम ४२० प्रमाणे विविध गुन्हे दाखल झाले आहेत, या प्रकरणांमध्ये बार्शीटाकळी पंचायत समितीचे काही मोठ्या अधिकाराचा कर्तव्यात कसूर असल्याने त्यांचे विरुद्ध सुद्धा ४२० प्रमाणे पोलिसात गुन्हे दाखल होणार असल्याची शक्यता आहे, या प्रकरणामुळे बार्शीटाकळी तालुक्यातच नव्हे तर, संपूर्ण अकोला जिल्ह्यात प्रचंड अशी खळबळ माजलेली आहे, उमरदरी बहिरखेड ग्राम पंचायत चे प्रकरण चांगलेच गाजले असून यामध्ये संबंधित अधिकारी दोशी असल्याचे समजते, त्यामुळे या प्रकरणात अजून दोशी अधिकाऱ्याविरुद्ध निश्चितच कारवाई होणार असल्याचे संकेत प्राप्त झाले आहे, त्यामुळे भविष्यात सुद्धा उमरदरी बहिरखेड गट ग्राम पंचायत चर्चेतच राहणार असे चिन्ह दिसत आहेत.

# शेलूबाजार येथे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यभूत साधनांचे मोफत वितरण खासदार श्री संजय देशमुख यांच्या हस्ते संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गणेश पाटील बोथे.**





शेलुबाजार : मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथे दिनांक ०४ मार्च २०२६ बुधवारी रोजी सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या विविध कल्याणकारी योजनें तर्गत तसेच खासदार मा. श्री. संजय देशमुख साहेब यांच्या विशेष पाठ पुराव्या मुळे शेलू बाजार येथे दिव्यांग बांधव-भगिनी व ज्येष्ठ नागरिकां साठी सहाय्यभूत साधनांचे मोफत वितरण लोकप्रिय खा. संजय बापू देशमुख साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंगरुळ नाथ तालुका शिवसेना उद्धव बाळा साहेब ठाकरे वतीने मान्य वरांचे शाल श्रीफळ पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले. मागील वर्षी शेलूबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरा मध्ये सुमारे १५० दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी करण्यात आली होती. त्या सर्व पात्र लाभार्थ्यांना आज अहिल्या देवी सामाजिक सभागृह, माले गाव रोड, शेलू बाजार येथे आयोजित कार्य क्रमात आव श्यक सहाय्यक उपकरणांचे वितरण करण्यात आले, काही लाभार्थी येऊ शकले नाही त्याचे साहित्य वितरण करण्याचे बाकी आहे ते लवकरच त्या लाभार्थींना संपर्क करून देणार आहे,या वितरणा मध्ये A D I P योजना (अपंग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे) तसेच राष्ट्रीय वयोश्री योजना (RVY) अंतर्गत विविध साहित्य देण्यात आले. यामध्ये श्रवण यंत्र, व्हीलचेअर, ट्राय सायकल, काठी, वॉकर, पट्टा आदी आवश्यक साधनांचा समावेश होता. या साधनांमुळे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवन अधिक सुलभ व स्वावलंबीपणे जगता येणार असल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास उपस्थित मान्य वरांनी आपल्या मनोग तातून शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोच विण्याची गरज अधोरेखित केली. समा जातील दुर्बल घटकांना सक्षम करण्या साठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे त्यांनी नमूद केले. लाभा र्थ्यांनी शासन व आयोजकांचे आभार मानत आनंद व्यक्त केला. अनेक ज्येष्ठ नागरि कांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंदाचे भाव पाहायला मिळाले. सदर कार्य क्रमाचे आयोजन शिवसेना (उद्धव बाळा साहेब ठाकरे) – मंगरूळनाथ तालुका यांच्या वतीने करण्यात आले. कार्य क्रमाच्या यशस्वी आयोजना साठी सर्व प्रशासकीय अधि कारी, कर्मचारी, तालुका विस्तार अधिकारी, ग्राम पंचायत शेलू बाजार कर्मचारी शिव आरोग्य सेना वाशिम यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या मार्गदर्शना खाली कार्यकर्त्यांनी नियोजन बद्ध तयारी करून कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पाडला. हा उपक्रम सामाजिक बांधि लकीची जाणीव जपत समाजातील गरजू घटकांना आधार देणारा ठरला आहेया कार्यक्रम प्रसंगी संचलन शिवा सावके यांनी केले तर आभार डॉ. सुनिल राऊत यांनी व्यक्त केले प्रसंगी वाशीम जिल्हा संघटक गजाननराव देशमुख उपजिल्हा प्रमुख अनिल पाटील राऊत, तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे, वाशीम तालुका प्रमुख रामदास मते पाटील तालुका संघटक बबनराव सावके पाटील, सरपंच देविदास मुखमाले, संतोष लांभाडे तालुका मार्गदर्शक अशोकराव हांडे सरपंच डॉ श्रीराम मुखमाले, कृ ऊ बा समिती चे सुरेश पाटील राऊत मा उप सभापती नंद किशोर लांभाडे, प्रा. पवन राऊत, डॉ. अरविंद राठोड, उमेश राठोड प स सदस्य बंडू भाऊ वैद्य, युवासेना तालुका प्रमुख धीरज राऊत, उप तालुका प्रमुख पांडुरंग राऊत, गोवर्धन पाटील, वसंतराव चव्हाण, मुलचंद राठोड, रमेश राठोड गणेश बोथे, विकास कोंगे पाटील, गणेश राऊत बाळकृष्ण रोकडे सर्कल प्रमुख देविदास जाधव, सतीश गावंडे, विठ्ठल खंडारे कैलास राठोड, श्री कृष्णा कुरवाडे, जगन्नाथ इंगोले, दिवाकर जैन अनिल राऊत ,या सह मंगरूळ नाथ तालुक्यातील समस्त दिव्यांग बांधव तथा तालुका पदा धिकारी खूप मोठ्या संकेने उपस्थित होते.

# जागतीक महीला दिना निमीत्त डॉ.सुक्ष्मा उपाध्ये यांचे ती घडविते आयुष्य या विषयावर मार्गदर्शन संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**






कारंजा लाड : जागतीक महीला दिनाचे औचीत्य साधत आमदार श्रीमती सईताई प्रकाश पाटील डहाके यांचे पुढाकारात विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .कारंजा पंचायत समीती व शिक्षण विभागाचे समन्वयाने दि. ५ मार्च रोजी विद्याभारती कनीष्ठ महा विद्यालय कारंजा येथे ती घडविते आयुष्य या विषयावर काजळेश्वर निवासी डॉ सुक्ष्मा विशाल उपाध्ये यांचे सकाळचे सत्रात व्याख्यान संपन्न झाले. यावेळी व्यास पीठावर सामाजीक कार्यकर्त्या सौ तेजूताई डहाके; बीडीओ राणे मॅडम; उपप्राचार्य रोकडे मॅडम; प्रविण कानकिरड; संतोष चौधरी; राजगुरे सर; व्याखाता डॉ सौ.सुक्ष्मा उपाध्ये यांची प्रमुख उपस्थीती होती. प्रथम मॉसाहेब जीजाऊ; सावीत्री बाई फुले यांच्या प्रतीमाचे पूजन उपस्थीतांनी करुन त्यांना अभिवादन केले. व्याख्याता डॉ सौ सुक्ष्मा उपाध्ये यांचा सन्मान आयोजन समिती कडून करण्यात आला. याप्रसंगी महिलांचे आरोग्य याविषयावर डॉ सौ सुक्ष्मा उपाध्ये यांनी मागदर्शन केले जीवन जगत असतांना महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. स्त्री जर निरोगी असेल तर ती कशी भविष्य घडविते याबाबत विस्तृत सुंदर विवेचन आपल्या व्याख्या नातून डॉ उपाध्ये यांनी केले. याप्रसंगी महीला वर्ग तसेच कनीष्ठ महा विद्यालयात शिकनाऱ्या मुलींची मोठ्या संख्येने उपस्थीती होती.

# महान परिसरात गव्हाची एकरी झडती १२ ते २२ क्विंटल पर्यंत; हा वर्ष होता गहू पीकाचा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अनिस शेख.**





महान : या वर्षी महान आणि परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात नोव्हेंबर महिन्यात गहू पिकाची सर्वाधिक पेरणी केली होती.तर अनेक कपाशी उत्पादक शेतकऱ्यांनी सुद्धा कपाशी ची पीके उपटून जानेवारी अखेर पर्यंत गव्हाची पेरणी केली होती.नोव्हेंबर,डिसेंबर महिन्यात पेरणी झालेला गहू पूर्णपणे परिपक्व होऊन आज रोजी मळणी यंत्रणेतून काढण्यास तयार झाल्याने महान व परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी गहू काढणीस सुरुवात केली असून या वर्षी गहू पिकाचे अधिक प्रमाणात उत्पन्न होत असून महान व परिसरातील शेतकऱ्यांना गव्हाची एकरी झडती १२ क्विंटल पासून २२ क्विंटल पर्यंत लागत असल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद उमटलेला दिसत आहे.या वर्षी थंडी जास्त प्रमाणात पडल्याने व मुबलक पाणी मिळाल्याने त्याचा फायदा गहू पिकाला झाला असल्याने गव्हाची रेकॉर्ड ब्रेक झडती शेतकऱ्यांना लागत आहे.

**हार्वेस्टिंग चा खर्च एकरी १८०० ते २००० रुपये!**

गहू पिकाची मळणी करिता राजस्थान कडून हार्वेस्टिंग च्या मशीन महान येथे दाखल झाले असून या हार्वेस्टिंग द्वारा गहू पिकाची मळणी करिता एकरी १८०० ते २००० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांना द्यावे लागत आहे. हा वर्ष हरभरा पिकाचा नसून गहू पिकाचा होता आल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

**हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना जबर फटका!**

पाण्याची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात पेरणी केल्या जात असलेल्या हरभरा पिकाची गेल्या नोव्हेंबर, आणि डिसेंबर महिन्यात हरभरा ची पेरणी केली होती.फुलावर येईपर्यंत हरभरा ची पिके उत्तम दिसत होती.परंतु अचानक हरभरा पिकावर रोगराई आणि व्हायरस आल्याने पिके ग्रासले असून हरभरा घाटे धरण्याआधी पिवळी पडून सुकली आहे. हरभरा ची मळणी यंत्रणेतून काढणी केली असता एकरी सरासरी २ क्विंटल ते १० क्विंटल पर्यंत शेतकऱ्यांना झडती लागत असल्याने अनेक शेतकऱ्यांना लावलेला खर्च ही काढता आला नाही.उत्तम दिसत असलेला हरभरा निसर्गाने शेतकऱ्यांच्या तोंडातला घास हिसकावून घेतला आसल्याने शेतकरी वर्ग आज रोजी कर्ज बाजारी झालेला आहे. महान आणि परिसरात गहू,आणि हरभरा २५,% पर्यंत शेतकऱ्यांनी काढून तयार केला असून ७५% गहू , हरभरा मळणी यंत्रणेतून काढने बाकी आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती निमित्त भव्य कीर्तन सोहळा व गरजूंना साहित्य वाटप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**




परभणी : गोपाला फाउंडेशन परभणी च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त भव्य दिव्य कीर्तन सोहळा व गरजूंना साहित्य वाटप आणि कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमासाठी कीर्तनकार ह भ प शिवांजलीताई जरांगे पाटील यांचे कीर्तन होणार महामेरू मृदंगाचार्य ह भ प कृष्णा महाराज भोरकडे तसेच विशेष आकर्षक झी टॉकीज ची बालकलाकार कु. साची भोयर, बाल व्याख्याते कु. आरोही खंदारे , कु.श्रद्धा चव्हाण यांची उपस्थिती राहणार आणि तसेच गरजूंना साहित्य वाटप एक पिठाची गिरणी सहा नग शिलाई मशीन तीन सायकल एक नग इस्तरी दहा नग शैक्षणिक साहित्य आधी बहुसंख्य वाटप होणार आहे तरी जास्त जास्त भाविक भक्तांनी या कीर्तनाचा व साहित्य वाटपाचा कार्यक्रमाचा लाभ घ्या दिनांक ७ मार्च २०२६ रोजी शनिवारी रात्री सहा वाजता उघडा महादेव मंदिर जवळ कारेगाव रोड येथे होणार आहे. कार्यक्रमाचे मार्गदर्शक गोपाला फाउंडेशन चे मार्गदर्शक अँड पवन निकम गोपाला फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष खराटे यांच्या पुढाकारातून मागील अकरा वर्षापासून सामाजिक धार्मिक अध्यात्मिक साहित्य वाटप आदी उपक्रम आयोजन करत आहेत याही वर्षी कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले आहे एक हात मदतीचा या बीज वाक्याने हे उपक्रम चालू आहे तर त्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आमदार राहुल पाटील भाजपचे उद्योजक अँड पवन निकम, गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, विशाल बुधवंत प्रदीप भालेराव सर्व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते समाजसेवक महाराज मंडळी संत सर्व समाज बांधव आमदार खासदार मंत्री नगरसेवक सर्व चळवळीत काम करणारे ज्येष्ठ नागरिक महिला पुरुष युवक युवती उपस्थित राहणारे असे आव्हान आयोजक गोपाला फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष संतोष भैया खराटे गोपाला फाउं डेशन सचिव कृष्णा शिंदे यांच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे अशी माहिती गोपाला फाउं डेशनचे अध्यक्ष संतोष खराटे यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली.

# दिव्यात तिसाई नगर येथे शिवजयंतीचे मोठ्या उत्साहात साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**





ठाणे : दिवा शहर शिवसेना शाखा तिसाई नगर दिवा शहर शिव सेनेचे शहर प्रमुख व माजी उप महापौर रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शना खाली फाल्गुन कृष्ण ३ शके १९४७ गुरुवार दिनांक ६मार्च २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेच्या उपस्थिती मध्ये तिथी नुसार शिव जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे दिनक्रम सकाळी ६ ते ८ प्रयत्न शिवज्योत आगमन स्वराज्य प्रतिष्ठान, सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली व शालेय विद्यार्थ्यांना वस्तू वाटप करून सायंकाळीं ६ ते ७ दरम्यान सोमजाई भजन मंडळ, दिवा यांचे भजन कीर्तन होईलतसेच वकृतुंड म्युझिकल ग्रुप दिवा यांचा सुस्वर गीत व चोपड्याचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला असे आयोजक व शिवसेनेचे तीसाई शाखाप्रमुख निलेश रोहिदास म्हात्रे यांनी यावेळी बोलताना सागितले. उपशाखा प्रमुख, गट प्रमुख, महीला शाखा संघटक,उप शाखा संघटक, गट संघटक व समस्थ पदाधिकारी यांनी मोठ्या उत्साहात उपक्रमाचे आयोजन केले आहे. दिवा दातीवली रोड,शिवसेना शाखा तीसाई नगर येथे कार्य क्रमाचे आयोजन करण्यात आले आहे समस्त दिवावसियानी उपस्थित दाखवत या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घेतला असे निलेश म्हात्रे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केलं

# जिंतूर तालुक्यात निराधार योजनेत पारदर्शकता आणणार - डॉ.पंडितराव दराडे
## तहसील कार्यालयात निराधार समितीची बैठक;
## गरजू लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोक कल्याणकारी योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू व निराधार नागरिकांपर्यंत पोहोचविण्या साठी जिंतूर तालुक्यात निराधार योजनेच्या कामात पारदर्शकता आणली जाणार आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन निराधार योजना समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे यांनी केले. येथील तहसील कार्याल यात शुक्रवारी (दि. ६) निराधार योजना समितीच्या संचालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. बैठकीस तहसील दार श्रीमती शितल कच्छवे, नायब तहसील दार प्रशांत राखे, नगर परिषद मुख्याधिकारी उमेश ढाकणे, सहाय्यक गटविकास अधिकारी एस. व्ही. ढोने यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. दराडे म्हणाले, शासनाने नागरिकांच्या कल्याणा साठी विविध योजना सुरू केल्या आहेत. पालकमंत्री सौ. मेघना दीदी साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्ग दर्शना खाली जिंतूर तालुक्यातील गरजू नागरिकांना निराधार योजनेचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. काही जण या योजनेचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे खरे गरजू लाभार्थी वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन समितीच्या माध्यमातून योजनांची अंमलब जावणी पारदर्शक पणे करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक तसेच खऱ्या अर्थाने निराधार असलेल्या नागरिकांना विविध योजनांद्वारे आर्थिक सहाय्य कसे मिळवून देता येईल, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दरम्यान, समितीचे संचालक गजानन चौधरी, माधव राठोड, दिपाली ठाकूर, रवी रणबावळे, संतोष माने, अंकुश बकान, रामेश्वर पोंदाळ यांचा तहसील कार्याल याच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी महसूल सहाय्यक ए. बी. होळंबे, ए. एस. घुगे, महसूल सहाय्यक आम्र पाली अवचार, तलाठी एस. जी. शहारे, शुभम आडके यांनी पुढाकार घेतला. जिंतूर तालुक्यातील आठ महसूल मंडळांसाठी पालक मंत्री सौ. मेघना दीदी साकोरे – बोर्डीकर यांच्या शिफार शीवरून निराधार योजना समितीच्या संचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातील आदेश जिल्हा धिकारी यांनी तहसीलदार जिंतूर यांना पाठविले आहेत. या महसूल मंडळांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोक कल्याण कारी योजना पारदर्शक पणे राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# डोणगावची 'गुगल गर्ल' कोमल खनपटेचा विक्रम;
## अवघ्या १० सेकंदांत भारतातील सर्व राज्यांची नावे सांगत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नोंद

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**






मेहकर : मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील कुमारी कोमल देविदास खनपटे हिने आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या जोरावर इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवत बुलढाणा जिल्ह्याचा अभिमान वाढवला आहे. अवघ्या १० सेकंदांत भारतातील सर्व राज्यांची संपूर्ण नावे अचूकपणे सांगण्याचा अनोखा विक्रम तिने प्रस्थापित केला आहे. तिच्या या कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाचा वर्षाव होत असून परिसरात तिला प्रेमाने "गुगल गर्ल" म्हणून ओळख मिळू लागली आहे.डोणगाव येथील श्री शिवाजी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेणारी कोमल लहानपणापासूनच अभ्यासू, जिज्ञासू आणि सामान्य ज्ञानात विशेष रस असलेली विद्यार्थिनी आहे. वाचनाची आवड, नवीन विषय जाणून घेण्याची उत्सुकता आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर तिने हा विक्रम गाठला आहे.भारताच्या सर्व राज्यांची नावे अवघ्या १० सेकंदांत अचूकपणे आणि सलग उच्चारण्याचे कौशल्य तिने सिद्ध केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने तिच्या नावाची अधिकृत नोंद केली आहे.या विक्रमाबद्दल कोमलला इंडिया बुक ऑफ रेकॉर्डकडून प्रमाणपत्र, खास IBR पेन, रेकॉर्ड होल्डर ओळखपत्र, पुस्तकाची प्रत, I B R बॅज, 'Medal of Achievement' सन्मान पदक तसेच दोन IBR कार स्टिकर्स देऊन गौरविण्यात आले आहे.कोमलच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक तसेच गावकऱ्यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे. "कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द असेल तर कोणतेही ध्येय गाठता येते," असे मत कोमलने व्यक्त केले.विशेष म्हणजे, कोमलचे वडील देविदास खनपटे हे पत्रकार असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि घरातील शैक्षणिक वातावरणा मुळे कोमलला लहानपणा पासूनच सामान्य ज्ञानाची आवड निर्माण झाली, असे सांगितले जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये दडलेली प्रतिभा योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास मोठे यश मिळवू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कोमल देविदास खनपटे होय. तिच्या या यशामुळे जिल्ह्यातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# परतूर येथे शेतक-यांना पिक विमा पॉलिसीचे वाटप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कुलदीप बिनगे.**

परतूर : प्रधानमंत्री पिक विमा योजनेत रब्बी हंगामात ज्या कर्जदार शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला होता, त्यांना भारतीय कृषी विमा कंपनी व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विमा पॉलिसीचे वाटप करण्यात आले. केंद्र 'शासनाची मेरी पॉलिसी मेरे हात' ही योजना देशभरात सुरू आहे. परतूर तालुक्यातील शेतकऱ्यांना पॉलिसीचे वितरण वीमा प्रतिनिधी हरिओम गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी हरिओम गोरे यांनी



शेतकऱ्यांना पीक विम्याचे महत्त्व समजावून सांगितले पावसाच्या लहरीपणा मुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी पिकांचे आगाऊ संरक्षण करणे आवश्यक आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात ही योजना शेतकऱ्यांसाठी मोठे कवच ठरते असे यावेळी सांगितले या उपक्रमामुळे विमा प्रक्रियेत पारदर्शकता वाढून शेतकऱ्यां मध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# परभणीत एलसीबीचा सापळा यशस्वी; घरफोडी-चोरीतील दोन अट्टल गुन्हेगार जेरबंद
## सोनपेठ, जिंतूर, गंगाखेडसह पाच ठाण्यांतील गुन्ह्यांचा उलगडा;
## एकावर मोका कायद्याखाली गुन्हा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



परभणी : जिल्ह्यातील फरार व पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यातील दोन अट्टल आरोपींना जेरबंद केले. या आरोपींपैकी एकावर यापूर्वी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (मोका) कायद्यांतर्गत गुन्हा नोंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांनी आरोपीं कडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेला लोखंडी खंजर असा एकूण १ लाख ८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या आदेशानुसार तसेच अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात फरार आरोपींच्या शोधासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विवे कानंद पाटील यांच्या नेतृत्वा खालील पथक गंगाखेड परिसरात शोधमोहीम राबवत होते. यावेळी बातमी दारामार्फत माहिती मिळाली की, शेष्या उर्फ शेषेराव चपऱ्या काळे (वय ३८, रा. मोहळ, जि. सोलापूर) हा खळी फाटा परिसरात थांबलेला आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ सापळा रचून शेष्या काळे याला ताब्यात घेतले. त्याच्यासोबत असलेला आलीश उर्फ आल्या उर्फ काळया सुरेश काळे (रा. दत्तनगर, मोहळ, जि. सोलापूर) यालाही पोलिसांनी पकडले. दोन्ही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेत आणून कसून चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्यांनी परभणी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घरफोडी व चोरीचे अनेक गुन्हे केल्याची कबुली दिली.आरोपी क्रमांक एक शेष्या काळे याची झडती घेतली असता त्याच्या कंबरेला लपवून ठेवलेला लोखंडी खंजर पोलिसांना आढळून आला. हा खंजर पंचासमक्ष जप्त करण्यात आला. पुढील तपासात आरोपींनी सोनपेठ, परभणी ग्रामीण, जिंतूर, दैठणा आणि गंगाखेड या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे केल्याचे उघड झाले. या गुन्ह्यांमधून पोलिसांनी १ लाख ८ हजार ९५० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र, चांदीचे दागिने, रोख रक्कम तसेच इतर मुद्देमाल जप्त केला आहे. काही दागिने विक्री केल्याची कबुली आरोपींनी दिली असून त्या अनुषंगाने पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.या कारवाईत पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस उपनिरीक्षक चंद्रसिंह परिहार तसेच पोलीस कर्मचारी महेश कवठाळे, राहुल परसोडे, सिद्धेश्वर चाटे, माणिक वाघ, केशव लटपटे, सचिन भदर्गे, रंगनाथ दुधाटे, नामदेव डुबे, राम पोळ, दिलीप निलपत्रेवार, गजानन क्षीरसागर, उमेश चव्हाण, मधुकर ढवळे, शरद सावंत, कश्यप साने, उत्तम हनवते, सायबर सेलचे गणेश कोटकर आणि कांगणे यांनी सहभाग घेतला.या कारवाईमुळे जिल्ह्या तील घरफोडीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा झाला असून आरोपींना पुढील कायदेशीर कारवाई साठी संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# ब्रम्हा कुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय तथा ग्रामवासीकडून माजी प्राचार्य अशोकराव उपाध्ये यांचा सन्मान; कारंजा केंद्र संचालिक बीके मालती दिदि
## कारंजा सरपंच संघटणे कडून नितीन पाटील उपाध्ये यांची प्रमुख उपस्थीती

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**





कारंजा लाड : महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त माजी प्राचार्य ;जेष्ठ पत्रकार; सा योग योगेश्वरचे मुख्य संपादक अशोकराव उपाध्ये यांचा त्यांचे जन्मदिनी ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्व विद्याल याच्या प्रमुख संचालिका राजयोगी बीके मालती दिदि; कारंजा तालूका सरपंच संघटणेचे अध्यक्ष नितीन पाटील उपाध्ये यांनी सा . योग योगेश्वर प्रथम अंकाचे ऑन लाईन विमोचन करित अशोकराव उपाध्ये यांचा पुष्पगुच्छ देऊन दि ५ मार्च रोजी एका छोट्या कार्यक्रमात त्यांचे निवासस्थानी ईश्वरीय परीवारा सह सन्मान केला . याप्रसंगी ग्राम काजळेश्वर प्रमुख नितीन पा उपाध्ये; ख वि कारंजाचे संचालक विनोद पाटील उपाध्ये; राजे गृप प्रमुख ओमप्रकाश वानखडे;आदर्श शेतकरी तथा व्यावसाई संदीप उपाध्ये समाज सेवी सुरेश मालठाणे; ईश्वरीय केंद्राच्या गीता पाठशाला प्रमुख राजयोगी मालती दिदि; राजयोगी डॉ निखील भाई; राजयोगी विश्वनाथ पा ताथोड; ब्रम्हा कुमारीज केंद्राच्या बहना; भाई लोग यांची उपस्थीती होती . सा . योग - योगेश्वर वृत्तपत्र सकारात्मक पत्रकारीतेची नवी दिशा घेवून प्रसीद्ध होत असल्याचा आनंद राजयोगी मालती दिदि यांनी व्यक्त केला. अमरावती ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या झोनल प्रमुख राजयोगी सिता दिदि; बहूजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडू भाऊ इंगोले; गुरुदेव सेवा संघाचे विजय खंडार; गोवींद स्कुलचे प्रमुख किरण चौधरी; कारंजा तालुक प्रकार संघातर्फे सचिव पत्रकार ज्ञानेश्वर घुडे; ग्रामीण पत्रकार संघाचे सचिव राहूल गावंडे; काजळेश्वरवासी तर्फे सरपंच नितीन पा उपाध्ये यांनी वृत्तपत्रा साठी शुभेच्छा व्यक्त केल्यात व राज्य शासनाने गौरवित केलेल्या माजी प्राचार्य पत्रकार अशोकराव उपाध्ये यांचा सन्मान केला. अनेक चाहत्यानी मेसेजेस द्वारा शुभेच्छा दिल्याता .सर्वाना अल्पोपहार देऊन संपादक योगेश उपाध्ये यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# बंद टोल नाक्याची भिंत ठरतेय अपघातांचा सापळा; रिक्षा पलटी, चालक गंभीर
## वारंवार अपघाता नंतर ही दुर्लक्ष;
## लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देण्याची नागरिकांची मागणी


**सेवाशक्ती टाईम्स.**
**विनोद तेजनकर.**



वडगांव तेजन : दि. ६ मार्च २०२६ ता. लोणार (जि. बुलढाणा) येथील वडगांव तेजन परिसरातील बंद पडलेला टोल नाका सध्या अपघातांचा धोकादायक सापळा ठरत असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अनेक दिवसांपासून टोल वसुली बंद असतानाही रस्त्याच्या अगदी कडेला उभी असलेली टोल नाक्याची भिंत वाहनचालकांसाठी मोठा अड थळा ठरत आहे. या भिंतीमुळे वारंवार अपघात घडत असल्याने ती तात्काळ काढून टाकावी किंवा सुरक्षित अंतरावर हलवावी, अशी जोरदार मागणी ग्राम स्थांकडून करण्यात येत आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार संबंधित टोल नाका सध्या पूर्णपणे बंद असून येथे कोणतीही टोलवसुली होत नाही. मात्र टोल नाक्याची भिंत आणि रचना अजूनही रस्त्यालगत असल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा वेगाने येणाऱ्या वाहनांना ही भिंत अचानक समोर येत असल्याने चालकांचा ताबा सुटतो आणि अपघात घडतात. अनेकदा किरकोळ धडकांपासून गंभीर अपघातां पर्यंत घटना घडल्या असून वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान आज सैलानी कडून येणारी रिक्षा क्रमांक MH-२२-AP-२२८१) या ठिकाणी अपघातग्रस्त झाली. टोल नाक्याजवळील अरुंद जागा व रस्त्याची खराब अवस्था यामुळे रिक्षा चालकाने वाहन थोडे बाजूला घेतले असता रिक्षा अचानक पलटी झाली. या अपघातात रिक्षा चालक गंभीर जखमी झाला असून रिक्षामधील तीन महिलांनाही मार लागला आहे. जखमींना उपचारासाठी हलविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून सध्या भिंत अधिक स्पष्ट दिसावी यासाठी पांढरे व लाल रंगाचे पट्टे मारण्याचे काम सुरू आहे. मात्र हा उपाय केवळ तात्पुरता असून मूळ समस्या कायम असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. टोल नाका बंद असताना केवळ रंगाचे पट्टे मारून प्रश्न सुटणार नाही, तर अपघातांना कारणीभूत ठरणारी भिंतच हटविणे हा कायमस्वरूपी उपाय असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार या ठिकाणी यापूर्वीही अनेक वेळा अपघात घडले आहेत. वारंवार अपघात होत असूनही संबंधित प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना केलेली नाही. टोल नाका बंद असतानाही त्याची रचना रस्त्यावरच असल्याने हा भाग कायम धोकादायक बनला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून टोल नाक्याची भिंत काढून टाकावी किंवा सुरक्षित अंतरावर हलवावी तसेच त्या ठिकाणी वेगमर्यादा फलक, रिफ्लेक्टर, इशारा दिवे व दिशादर्शक फलक बसवावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान या गंभीर प्रश्नाकडे स्थानिक लोक प्रतिनिधीं नीही तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन प्रशासनाशी पाठपुरावा केल्यास या धोकादायक ठिकाणी योग्य ती कारवाई होऊ शकते असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे. वारंवार अपघात घडत असताना एखाद्याचा जीव गेल्यावरच प्रशासन आणि लोक प्रतिनिधी जागे होणार का असा संतप्त सवाल नागरि कांकडून उपस्थित केला जात असून वेळेवर कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# गोगरी येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यस्मरण महोत्सवानिमित्त व ब्रह्मलीन बाबुरावजी बोथे यांच्या २८ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य महाप्रसाद संपन्न
## ग्राम गोगरी दि. ५ मार्च २०२६ रोजी भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात भव्य महाप्रसादाचा लाभ घेतला

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गणेश पाटील बोथे.**




शेलुबाजार : मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथुन जवळच असलेले ग्राम गोगरी दर वर्षी प्रमाणे याही वर्षी महा प्रसादाचे भव्य आयोजन केले होते तरी गावकरी व पंचकोशितिल भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा लाभ घेतला, गाव गावासी जागवा भेदभाव समुळ मिटवा । उजळा ग्रामोन्नतीचा दिवा तुकड्या म्हणे ।। ग्रामगीता ज्ञान यज्ञ सप्ताह ह. भ. प. निलेश महाराज गावंडे यांच्या मधुर वाणीतून संपन्न हे महाज्ञान समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचुन मानव समाजाची सर्वांगीण उन्नति साधावी या करीता ग्राम गोगरी ता.मंगरूळपीर जि.वाशिम येथे रविवार दि. ०१ मार्च ते गुरुवार दि.०५ मार्च २०२६ ह.भ.प. श्री निलेश महाराज गावंडे यांच्या सुश्राव्य वाणीतुन श्री श्रीमद् ग्रामगीता ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन केले होते तसेच महोत्सवा दरम्यान सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना, रामधून ,भजन ,कीर्तन, अशा विविध भरीव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे अध्यक्ष अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनजीपंथ बोथे गुरुजी, प्रमुख पाहुणे सचिव नामदेवराव बोथे, ह. भ .प श्री निलेश महाराज गावंडे, श्री भाऊ साहेब काळे, श्री दिगंबरराव निचित, श्री सुनीलराव दशमुखे, विष्णुपंत राऊत, सरपंच केशव राव जटाळे, उपसरपंच सौ. कविताताई इंगोले, मुख्याध्यापक श्री निघोट सर, सतिष बोथे, अरविंद राठोड सर, शिंदे सर, दौलतराव इंगोले जि. प. सदस्य, श्री गणेशराव पवार पंचायत समिती सदस्य, श्री विनोदरावजी जाधव, श्री सुभाष राव शिंदे, विरेंद्रसिंह ठाकूर सर, डॉ श्री अनिलराव महाकाळ ,डॉ नरेशराव जयस्वाल, श्री दिगांबर राव निचित, यांच्या सह समस्त गोगरी ग्रामवासी, श्री गुरुदेव सेवा मंडळ व भजन मंडळ गोगरी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय गोगरी, येथील सर्व शिक्षक व विद्यार्थी व पंचकोशीतील सर्व भाविक भक्ताचा सहभाग होता गोगरी,हीरंगी ,इचा , नांगी, कंजरा, लाठी ,चिखली, सोनाळा, पिंपरी, येडशी, शेलु बाजार, किन्हीराजा ,आदीसह पंचकोशीतील भाविक भक्तांचा सहभाग होता.